वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-सोमवार दि.१५ डिसेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# बिहारमध्ये महिलेचा हिजाब काढला

## नितीश कुमारांच्या व्हिडिओने नवा वाद; विरोधकांचा संताप

### काँग्रेसने मागितला राजीनामा,नितीश बाबू आता १०० टक्के संघी झाले आरजेडीचा आरोप



मुंबई, (दिव्य न्युज):- बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांचा एक व्हिडिओ चांगलाच व्हायरल झाला असून एका बुरखाधारी मुलीच्या चेहऱ्यावरील बुरखा ते स्वत:च्या हाताने खाली सरकवत असल्याचं दिसून येतं. पाटणा येथे आयुष डॉक्टरांना नियुक्तीपत्राचे वाटप मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात येत होते. याच कार्यक्रमातील नितीश कुमार यांच्या व्हिडिओवरुन वाद राजकीय वादाला फोडणी मिळाली आहे.

Email.- dailydivyawarta@Gmail.com

# दिव्य वार्ता

Email.-editordivyawarta@gmail.com

सोशल मीडियावरील या व्हायरल या व्हिडिओवरुन आता आरजेडीने थेट नितीश कुमार यांच्या मानसिकतेवरच हल्लाबोल केला. आरजेडीच्या अधिकृत ट्विटर हॅंलडवरुन हा व्हिडिओ शेअर करण्यात आला आहे. नितीश बाबू आता १०० टक्के संघी झाले आहेत, असेही आरजेडीने म्हटले.

लालू प्रसाद यादव यांच्या राजद पक्षाने म्हणजेच आरजेडीने व्हिडिओ शेअर केला आहे. ज्यामध्ये, हिजाब परिधान केलेल्या एका महिलेच्या चेहऱ्यावरील हिजाब बाजुला काढताना मुख्यमंत्री नितीश कुमार दिसून येतात. नितीश कुमारांना हे काय झालंय? त्यांची मानसिक स्थिती आता अतिशय दयनीय झाली आहे, किंवा नितीश बाबू १०० टक्के संघी बनले आहेत, अशी बोचरी टीका राजद पक्षाने केली आहे. तर, काँग्रेसनेही या व्हायरल व्हिडिओवरुन संताप व्यक्त करत, हे कृत्य माफी योग्य नाही असे म्हटलं आहे.

हे बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार आहेत. यांचा निर्लज्जपणा बघा, जेव्हा एक महिला डॉक्टर आपले नियुक्तीपत्र घेण्यासाठी आली असता, नितीश कुमारांनी तिच्या चेहऱ्यावरुन हिजाब काढला. बिहारच्या सर्वोच्च पदावर असलेल्या व्यक्तीने जाहीरपणे असे नीच कृत्य केलं आहे. विचार करा, राज्यातील महिला किती सुरक्षित आहेत? असा सवाल काँग्रेसने उपस्थित केला आहे. नितीश कुमारांनी या कृत्याबद्दल तात्काळ राजीनामा दिला पाहिजे, हे माफीलायक नाही, असेही काँग्रेसने म्हटलं.

बिहार काँग्रेसनेही नितीश कुमार यांच्या व्हिडिओवरुन संताप व्यक्त केला ▶▶ पान २ वर

### बीड नगर परिषद निवडणूक निकालापूर्वीच अजित दादांनी केला वादा पुर्ण-आ.विजयसिंह पंडित

## अल्पसंख्यांक बहूल भाग मोमीनपुरा,सय्यदअली नगर भागात कोट्यावधींचा विकास निधी मंजूर-शेख निजाम



बीड, (दिव्य न्युज):- नगरपरिषद निवडणुकीच्या अनुषंगाने बीड नगर परिषदेच्या निवडणुकीच्या रणधुमाळी मध्ये अजित दादा यांनी मागील ३५ वर्षांमध्ये झालेला विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी मला फक्त पाच वर्षे संधी द्या असे आवाहन मतदारांना केले होते व मी कामाचा माणूस आहे जे बोलतो ते करतो याच उक्ती प्रमाणे अजित दादा पवार यांनी मोमीनपुरा भागातील अल्पसंख्यांक बहुल भागामध्ये विकास कामे करण्यासाठी अल्पसंख्यांक विकास योजनेतून कोट्यावधी रुपये मंजूर केलेले आहे त्यामुळे बीड शहरातील अल्पसंख्यांक बहुल भागाचा विकास व विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी मोमीनपुरा भागातील दायरा कब्रस्तान ते नसिब कटपीस पर्यंत सिमेंट रस्ता, सय्यदअलीनगर रस्ता,मोहम्मदिया कॉंलणी रस्ता, अबु हनिफा चौक ते बुस्टर पंप पर्यंत रस्ता, असे एकूण हया भागातील १० कामांना अल्पसंख्यांक विकास योजनेतून ५ कोटींहून अधिक अजितदादांनी मंजुर केले सदर कामे मंजूर करण्यासाठी व पाठपुरावा करुन आमदार विजयसिंह पंडित यांच्या मार्फत शेख निजाम यांनी अजित दादांकडे पाठपुरावा केला मा.अजित दादा यांनी मंजुरी देऊन अल्पसंख्यांक भागाच्या विकासाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मोठा निधी मंजूर केलेला असून टप्प्या टप्प्या ने हया भागातील ▶▶ पान २ वर

## तळणेवाडी शिवारातील तीस एकर ऊसाला आग




गेवराई, (दिव्य न्युज):- तळणेवाडी शिवारात वीज वितरण कंपनीच्या डीपी (डिस्ट्रिब्युशन पॉईंट) ची मनी फुटल्यामुळे अचानक आग लागून सुमारे तीस ते चाळीस एकर ऊस पिक जळून खाक झाल्याची घटना शनिवारी (दि. १३) सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेत पान २ वर

### पंकजा मुंडेंच्या पीएला पुन्हा अटक

## गौरी गर्जेची आत्महत्या नव्हे हत्या ?एसआयटीची कारवाई

मुंबई , (दिव्य न्युज):- मंत्री पंकजा मुंडे यांचे स्वीय सहाय्यक अनंत गर्जे यांच्या पत्नी गौरी हिने आत्महत्या केली होती. या प्रकरणी वरळी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गौरीच्या आई-वडिलांनी ही आत्महत्या नसून हत्या असल्याचा आरोप केला होता. पोलिसांनी अनंत गर्जेला अटक केली होती. मात्र, तो जामिनावर तुरुंगाच्या बाहेर आला होता.

या प्रकरणी तपास करण्यासाठी सरकारने एसआयटीची स्थापना केली होती. आता



एसआयटीकडून अनंत गर्जेला अटक करण्यात आली असल्याची माहिती आहे. अनंतला दुसऱ्यांदा अटक केली ▶▶ पान २ वर

### बळीराजाच्या वाटेतील अडथळे दूर होणार

## शेत रस्ते होणार आता दर्जेदार अन् अतिक्रमणेही निघणार!



मुंबई , (दिव्य न्युज):- पावसाळा आला की चिखलातून वाट काढताना होणारी शेतकऱ्यांची दमछाक आणि शेतमालाची वाहतूक करताना होणारे हाल आता थांबणार आहेत. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा आणि कृषी अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या शेत रस्त्यांच्या प्रश्नावर राज्य शासनाने ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. शेतापर्यंत पोहोचण्यासाठी पक्के आणि बारमाही रस्ते तयार करण्यासाठी राज्य शासनाने 'मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना' जाहीर केली असून, यामाध्यमातून आता गतीने आणि गुणवत्तेने रस्ते तयार केले जाणार आहेत. विशेष म्हणजे, वर्षानुवर्षे रस्त अडवून धरणाऱ्या अतिक्रमणांवर आता बुलडोझर चालणार असून, पोलीस बळाचा वापर करून ही अतिक्रमणे मोकळी करण्याचे कडक आदेश देण्यात आले आहेत.

राज्यातील शेतकऱ्यांना पेरणी, मशागत, कापणी आणि मळणीसाठी तसेच शेतमाल वेळेवर बाजारात पोहोचवण्यासाठी बारमाही रस्त्यांची ▶▶ पान २ वर

# राज्यात महापालिका निवडणूकांचे बिगूल वाजले

## मुंबई महापालिकेच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहिर, १५ जानेवारीला मतदान

मुंबई, (दिव्य न्युज):- आज निवडणूक आयोगाची महत्त्वाची पत्रकार परिषद पार पडली, या पत्रकार परिषदेमध्ये निवडणूक आयोगाकडून महाराष्ट्रातील महापालिका निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. राज्यात महापालिका निवडणुका कधी होणार? याकडे सर्वांचं लक्ष लागलं होतं, अखेर आता निवडणूक आयोगाकडून महापालिका निवडणुकीसंदर्भातील महत्त्वाच्या तारखांची घोषणा करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील २९ महापालिकांच्या निवडणुकीचा कार्यक्रम निवडणूक आयोगाकडून जाहीर करण्यात आला आहे. दरम्यान या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज हे ऑफलाईन पद्धतीने घेण्यात येणार असल्याचं देखील निवडणूक आयोगाकडून स्पष्ट करण्यात आलं आहे. तसेच उमेदवारांना निवडणूक झाल्यानंतर सहा महिन्यांच्या आत जात प्रमापत्र सादर करणं बंधनकारक असणार आहे. महापालिका निवडणुकीसाठी १ जुलै २०२५ ची मतदार यादी वापरण्यात येणार आहे.

दरम्यान या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोगाकडून मताधिकार हे ॲप तयार करण्यात आलं आहे. ज्यांचं दुबार मतदान आहे, त्यांच्या नावापुढे डबल स्टार करण्यात आलं आहे, ज्यांचं नाव दुबार असेल त्यांना एकाच मतदान केंद्रावर मतदान करण्यात येईल असंही यावेळी आयोगाकडून स्पष्ट करण्यात आलं आहे, तसेच मतदार यादितील दुरुस्तीचा अधिकार आयोगाला नसल्याचंही स्पष्ट करण्यात आलं आहे.

निवडणूक आयोगानं दिलेल्या माहितीनुसार महाराष्ट्रातल्या एकूण २९ महापालिकांच्या निवडणुकीची घोषणा करण्यात आली आहे. २९ महापालिकेमधील २८६९ जागांसाठी मतदान होणार आहे. या महापालिका निवडणुकीसाठी नामनिर्देश पत्र स्विकारण्याचा कालावधी २३ डिसेंबर ते ३० डिसेंबर असा असणार आहे, तर ३१ डिसेंबर रोजी अर्जाची छाननी होणार आहे, तर १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. १६ जानेवारी २०२६ रोजी मतमोजणी होणार आहे.

**महापालिका निवडणुकीच्या महत्त्वाच्या तारखा**

अर्ज स्वीकारणे २३ डिसेंबर ते ३० डिसेंबर, अर्जाची छाननी ३१ डिसेंबर, उमेदवारी ▶▶ पान २ वर



### मुंबई महापालिकेच्या निवडणुकीचं बिगुल वाजलं, १५ जानेवारीला मतदान

गेल्या अनेक दिवसांपासून राज्यात मुंबई महानगपालिका निवडणुकीची चर्चा आहे. या निवडणुकीची कधी घोषणा होणार, याची सर्वांनाच प्रतीक्षा लागली आहे. विशेष म्हणजे या निवडणुकीची कधीही घोषणा होण्याची शक्यता लक्षात घेता राज्यातील सर्वच महत्त्वाचे पक्ष कामाला लागले होते. शिवसेनेचा शिंदे गट आणि ठाकरे गट आणि भाजपा या तिन्ही पक्षांसाठी ही निवडणूक चांगलीच प्रतिष्ठेची आहे. त्यामुळेच काहीही झालं तरी ही निवडणूक जिंकायचीच असा प्रणच या पक्षांनी केला आहे. दरम्यान, ही निवडणूक कधी लागते, असे विचारले जात असतानाच निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेऊन मुंबई पालिकेच्या निवडणुकीची तारखी अखेर जाहीर केली आहे. निवडणूक आयोगाच्या घोषणेनुसार आता मुंबईत महानगरपालिकेची निवडणूक १५ जानेवारी २०२६ या तारखेला होणार असून निकाल १६ जानेवारी रोजी लागणार आहे.

# ठेकेदार कंपन्यांकडून निवडणुकीसाठी पैसे घेतल्याने शक्तीपीठ महामार्गाचा अटापिटा, राजू शेट्टी यांचा आरोप

कोल्हापूर, (दिव्य न्युज):- शक्तीपीठ महामार्गाची निवदा देण्याच्या अटीवर बड्या कन्स्ट्रक्शन कंपन्याकडून निवडणुकीच्या काळात मोठ्या प्रमाणात डव्हॉन्स घेतले आहेत. यामुळेच राज्यभरातून बाधित शेतकऱ्यांचा व्यापक विरोध असूनही दररोज एक मार्ग बदलून शक्तीपीठ महामार्ग रेटण्याचा अटापिटा सरकार करीत आहे, असा गंभीर आरोप स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक माजी खासदार राजू शेट्टी यांनी प्रसिद्धी पत्रकातून रविवारी केला.

पत्रकात म्हटले आहे, ज्या बड्या ठेकेदारांनी निवडणुकीसाठी पैसे दिले असतील, त्यांना अन्य मार्गाने पैसे अथवा ठेके मिळवून देण्यासाठी राज्याच्या तिजोरीत सध्या पैसा उपलब्ध नाही. यामुळे एकतर शक्तीपीठचे वेगवेगळे मार्ग दाखवून संबधित बड्या ठेकेदारांची सातत्याने दिशाभूल करत राहणे किंवा जनतेच्या डोक्यावर अनावश्यक १ लाख कोटीचे कर्ज काढून त्यामधून ५० हजार कोटींचा ढपला पाडण्याचा कट सरकारचा आहे. म्हणूनच, नागपूर अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगली, कोल्हापूर जिल्ह्यांतील मार्ग बदलणार, पण राज्यात शक्तीपीठ महामार्ग होणारच असल्याचे म्हटले.

सर्वच जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनी, ग्रामस्थांनी महामार्गासाठीच्या जमीन मोजणी होऊ दिलेली नाही. रत्नागिरी ते नागपूर हा राष्ट्रीय महामार्ग असताना, या महामार्गाला समांतर शक्तीपीठ महामार्ग करणे म्हणजे राज्याच्या जनतेवर १ लाख कोटी रुपयांचा कर्जाचा बोजा टाकणे असेच आहे. सध्या अस्तित्वात असणारा महामार्ग तोट्यात चालला असून, नवीन शक्तीपीठ महामार्ग केल्यास दोन्हीही रस्ते कर्जाच्या खाईत लोटणार आहेत. राज्यात सर्वत्र शक्तीपीठ महामार्गास विरोध होत असल्याने सरकार दिशाहीन झाले आहेत.दरम्यान, केवळ सोलापूरपासून नव्हे, तर विदर्भ मराठवाड्यात देखील पर्यायी रस्ते उपलब्ध असल्यामुळे संपूर्ण शक्तीपीठ महामार्ग रद्द करावा, अशी मागणीही शक्तीपीठ महामार्ग विरोधी संघर्ष समिती गिरीश फोंडे यांनी प्रसिद्धी पत्रकातून केली आहे. शक्तीपीठ महामार्गाची अलाइनमेंट सोलापूरपासून पुढे सिंधुदुर्गपर्यंत बदलणार असल्याचे सरकारने सांगितले आहे, हे उशिरा सुचलेले शहाणपण आहे. हा प्रकल्प फसलेला आहे. महामार्गाला ९० टक्के गावांत विरोध झाला आहे. कर्ज काढून महामार्ग बांधण्याची गरज नाही. त्यांनी विधानसभेत किंवा विधानसभेबाहेर कोठेही हा महामार्ग रद्द केल्याची घोषणा करावी. कोणत्याही परिस्थितीमध्ये हा महामार्ग होऊ देणार नाहीत, असेही त्यांनी स्पष्ट केले.



## येळंबघाटात चोरट्यांनी सोलार प्लांन्टवरून केबल पळवले

नेकनूर (दिव्य न्युज):- येळंबघाट शिवारातील गंगा सुख रिनेव्हल एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड या सोलार प्लांन्ट येथून केबल अज्ञात चोरट्यांनी बुधवार (दि.१०)रोजी रात्री चोरून नेल्याची घटना घडली असून एकूण १,३०,००० हजारांचा ऐवज लंपास केल्या प्रकरणी अज्ञात चोरट्यांविरोधात नेकनूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

बीड तालुक्यातील येळंबघाट शिवारातील सर्व्हे नंबर ७८,७९ येथील गंगा सुख रिनेव्हल एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीचा सोलार प्लांन्ट आहे.येथून अज्ञात चोरट्यांनी आर.आर लाल रंगाचे १४,०० मीटर केबल अंदाजे किंमत ६५,००० रुपये व आर.आर काळ्या रंगाचे १४,०० मीटर केबल अंदाजे किंमत ६५,००० रुपये असा एकूण १,३०,००० हजारांचा ऐवज लंपास केल्याची घटना बुधवार (दि.१०) रोजी रात्री ०१:०० ते सकाळी ०६:०० च्या सुमारास घडली असून विशाल पुरुषोत्तम जाखेटीया (वय ४६) मॅनेजर सोलार प्लांन्ट यांच्या फिर्यादीवरून रविवार (दि.१४) रोजी नेकनूर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे .

## गेवराईत अफवा उठली बिबट्या आल्याची अन् निघाला साळींदर

गेवराई , (दिव्य न्युज):- गेवराई तालुक्यातील मादळमोही सर्कल अंतर्गत भंडगवाडी गावात रविवारी रात्री ९.३५ वाजण्याच्या सुमारास वीज पोलवर बिबट्या चढल्याची अफवा पसरली. काही नागरिकांना पोलवर हालचाल दिसल्याचा संशय आल्याने ही माहिती काही वेळातच संपूर्ण गावात पसरली. परिणामी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून काही काळासाठी गावात गोंधळाचे चित्र दिसून आले.

या घटनेची माहिती मिळताच मादळमोही येथील सामाजिक कार्यकर्ते व नेहमी मदतीसाठी अग्रेसर असणारे राजेश रसाळ यांच्यासह अंगद कारले, संभाजी हक्कदार, विष्णू काचोळे, भीमसेन मिसाळ, दादा पवार, दत्ता घिगे यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी टॉर्च व वाहनांच्या प्रकाशाच्या सहाय्याने परिसराची बारकाईने पाहणी केली.पाहणीनंतर त्या ठिकाणी बिबट्या नसून 'उद' (साळींदर) हा प्राणी असल्याचे स्पष्ट झाले. खरी परिस्थिती समजताच नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला. मात्र अफवेच्या काळात काही काळ नागरिकांमध्ये भीती व तणावाचे वातावरण होते.वन्यप्राण्यांबाबत अफवा झपाट्याने पसरत असल्याने नागरिकांनी कोणतीही माहिती पसरवण्यापूर्वी तिची खात्री करून घ्यावी, तसेच संशयास्पद प्रकार आढळल्यास थेट वनविभाग किंवा पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन यावेळी राजेश रसाळ यांनी केले



पान ४ वरून

### अंबाजोगाईतील

नाहीत. त्यामुळे दिवसा आणि विशेषतः रात्रीच्या वेळी हे गतिरोधक वाहन चालकांच्या लक्षात येत नाहीत. परिणामी, भरधाव वेगातील वाहने अचानक आलेल्या गतिरोधकावर जोरात आदळत आहेत. यामुळे वाहनांचे नुकसान होत असून दुचाकीस्वार तोल जाऊन खाली पडण्याचे प्रकार नित्याचे झाले आहेत. गेल्या काही दिवसांत अनेक दुचाकीस्वार पडून जखमी झाले असून, काहीजण गंभीर जखमी झाल्याची माहिती आहे. सुदैवाने आतापर्यंत यात कोणाचाही नाहक बळी गेला नाही, मात्र अपघातांची मालिका सुरूच आहे.

### भरदिवसा महिलेच्या

गायकवाड (५८) रा.अंबिका नगर,पालवण रोड ह्या त्यांच्या नातेवाईकांना भेटून शहरातील घोलप कोचिंग क्लासेस समोरून पायी जात असताना अज्ञात दोघांनी दुचाकीवर येत त्यांच्या गळ्यातील १३ ग्रॅमचे मिनी गंठण अंदाजे किंमत ६०,००० रुपये व २ ग्रॅमचे मंगळसूत्र अंदाजे किंमत १०,००० रुपये असा एकूण ७०,००० हजारांचा ऐवज लंपास केल्याची घटना रविवार (दि.१४) रोजी सायंकाळी ०६ च्या सुमारास घडली असून अज्ञात दोन आरोपींविरुद्ध शिवाजीनगर पोलीस ठाण्यात सुनीता गायकवाड यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

### बारा वर्षानंतर

कोर्टाच्या निर्देशांनुसार बीड शहरातील मोकाट कुत्र्यांना खाऊ घालता येईल असे चार ठिकाण पालिकेने निश्चित केले आहेत. त्यामध्ये सोमेश्वर मंदिराजवळ बिंदुसरा नदीपात्र शेजारी, खंडेश्वरी देवी मैदानासमोर बीड तालुका क्रीडा संकुल परिसर, मोंढा रस्त्यावरील फटाका मार्केटजवळील पुलाशेजारी मोकळी जागा, करपरा नदीकाठी निश्चित केलेला परिसर येथे कुत्र्यांना खाऊ घालता येणार आहे. शहरातील मोकाट कुत्र्यांना एका ठराविक सुरक्षित ठिकाणी ठेवण्यासाठी पालिका शहराबाहेरील जागेचा शोध घेत आहे. ही योजना अमलात आल्यास शहरातील मोकाट कुत्र्यांमुळे नागरिकांना होणाऱ्या त्रासापासून मोठा दिलासा मिळू शकतो. मात्र याला सहा महिन्याचा कालावधी लागणार आहे.

### चिंचोली माळी येथील

दंडात्मककारवाई करण्यात यावी,केज तालुक्यातील विहीर व गायगोठा, घरकुलाचे हप्त्ये तात्काळ लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करावे, मस्साजोगचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांची सत्या करणारा एक आरोपी आणखी अटक झाली नाही त्याला अटक करण्यात यावी व सर्व आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी.चिंचोली माळी येथील कर्मवीर विद्यालयाची २००५ ते २०२५ पर्यंत सखोल चौकशी करण्यात यावी , पटसंख्ये पेक्षा जास्त शिक्षक असणाऱ्या शिक्षकांना निलंबित करण्यात यावे, कर्मवीर विद्यालय १० बोर्ड परीक्ष केंद्र आहे परीक्षा केंद्रावर सुविधा उपलब्ध असतात त्या नियमानुसार आहेत का याची चौकशी करण्यात यावी सुविधा नसतील परीक्षा केंद्र रद्द करण्यात यावे,संस्थे मध्ये एसटी चा व्यक्ती भरला आहे त्याची जात वैधता भोगस आहे का त्यांची चौकशी करण्यात यावी,तसेच कर्मवीर विद्यालयातील सर्व शिक्षकांची शैक्षणिक गुणवत्ता तपासणी करण्यात यावी ,शिक्षक भरती करण्यासाठी शिक्षकांकडून संस्थाचालकांनी अंदाजित आठ नऊ लाख रुपये घेतले आहे व दंडमशाहीने शिक्षकांन कडुन संस्थाचालकाने तुम्ही मला पैसे दिले नाहीत असे बॅन्ड प्रमाणपत्र लीहुन घेतले आहेत असे समजले जाते तरी यांची चौकशी प्रशासनाने करण्यात यावी जर असे झाले असेल तर संस्थाचालक यांच्यावर कारवाई करण्यात अशा मागण्यासाठी १७ /१२/२०२५ रोजी श्री संत नामदेव महाराज सभागृह येथे अन्नत्याग उपोषणाला बसणार आहे तरी मला उपोषणा दरम्यान काही झाले माझे बरेवाईट झाले तर प्रशासन केज तहसीलदार, जिल्हाधिकारी साहेब लोकप्रतिनिधी व वरील विभागाचे अधिकारी जबाबदार राहतील अशी निवेदनाद्वारे विनंती करण्यात येत आहे तरी माझ्या अन्नत्याग उपोषणाची दखल प्रशासनाने घ्यावी ही नंम्र विनंती असे निवेदनाद्वारे रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे.

पान १ वरून

### बिहारमध्ये महिलेचा

आहे. नितीश कुमार यांचे हे कृत्य अत्यंत लाजीरवाणे आणि निषेधार्ह आहे. जर राज्याचे प्रमुखच सर्वांदेखत उघडपणे असे कृत्य करत असतील तर, राज्यातील महिलांच्या सुरक्षेचं काय? असा प्रश्न काँग्रेसने उपस्थित केला आहे. महेश गलांडे एबीपी माझा डिजिटलमध्ये डेप्युटी प्रोड्यूसर म्हणून कार्यरत आहेत. पत्रकारितेत एकूण १३ वर्षे आणि डिजिटल पत्रकारितेत ११ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव त्यांच्या पाठिशी आहे. यापूर्वी ईटीव्ही मराठी, लोकमत या माध्यम संस्थांमध्ये त्यांनी काम पाहिलं असून

राजकीय लेखन, सामाजिक विषयाची जाण व भान आहे.

### अल्पसंख्यांक बहुल

टप्प्या ने हया भागातील मागील ३५ वर्षापासून प्रलंबित असणारे सर्व विकास कामे पालकमंत्री अजित दादा पवार, आ.विजयसिंह पंडित, जिल्हाध्यक्ष अँड.राजेश्वर चव्हाण,शेख मुजीब भाई यांच्या मार्गदर्शनात करुन घेऊ व येणाऱ्या काळात मा.आ विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखालील पालकमंत्री मा.अजितदादा पवार यांच्या सोबत अल्पसंख्यांक समाजातील सर्व घटकातील लोक उभे राहणार शहरात व बीड मतदारसंघात बदल घडवू असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष शेख निजाम जैनोद्दीन , शेख खय्युम इनामदार, मोमीन जुबेर, हाफिज अशपाक,शेख सत्तार इनामदार,बबलू गलधर,शेख इरफान, मोमीन जानी, यांनी म्हटले आहे

### तळणेवाडी

शेतकऱ्यांचे अंदाजे ३५ ते ४० लाख रुपयांचे अतोनात नुकसान झाले आहे.

या आगीत धर्मराज शिंगाडे, गणेश शिंगाडे, शिवाजी शिंगाडे, सुदाम एडके, माधव एडके, विलास वाघमोडे व बप्पासाहेब वाघमोडे या शेतकऱ्यांच्या ऊस पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.ऊस काढणीच्या तोंडावर असताना ही दुर्घटना घडल्याने शेतकरी वर्गात तीव्र संताप व्यक्त होत आहे. दरम्यान, संबंधित डीपीबाबत महावितरणकडे यापूर्वीही अनेक वेळा लेखी तक्रारी करण्यात आल्या होत्या, अशी माहिती शेतकरी शिवाजी शिंगाडे यांनी दिली.मात्र, वेळेत दखल न घेतल्यामुळेच हा अपघात घडल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी महावितरणकडून तातडीने पंचनामा करून योग्य भरपाई देण्याची मागणी केली आहे.

### शेत रस्ते होणार

अत्यंत आवश्यकता असते. यांत्रिकीकरणामुळे शेतात ट्रॅक्टर आणि हार्वेस्टर जाणे गरजेचे झाले आहे, मात्र पाणंद रस्ते नसल्याने किंवा ते खराब असल्याने शेतकऱ्यांची मोठी कोंडी होत होती. ही समस्या ओळखून महसूल व वन विभागाने १४ डिसेंबर २०२५ रोजी या महत्त्वाकांक्षी योजनेचा शासन निर्णय जारी केला आहे. आतापर्यंत 'मातोश्री ग्रामसमृद्धी' योजनेतून कामे होत होती, पण आता या नवीन योजनेद्वारे पूर्णपणे यंत्रसामुग्रीचा वापर करून जलद गतीने रस्ते तयार केले जाणार आहेत.

या योजनेचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे अतिक्रमणाबाबत घेतलेली कडक भूमिका होय. अनेक ठिकाणी जुने रस्ते शेतकऱ्यांनीच अतिक्रमित केल्यामुळे वादाचे प्रसंग निर्माण होतात. आता अशा रस्त्यांच्या मोजणीसाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही आणि ही मोजणी 'तातडीची मोजणी' म्हणून केली जाईल. तहसीलदार अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीला अतिक्रमण काढण्यासाठी ७ दिवसांची नोटीस देतील. जर संबंधित व्यक्तीने अतिक्रमण काढले नाही, तर शासन स्वतः यंत्रसामुग्री लावून ते अतिक्रमण काढून टाकेल. यासाठी लागणारा पोलीस बंदोबस्त मोफत पुरवला जाणार असून, यामध्ये अडथळा आणणाऱ्यांवर थेट फौजदारी कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

रस्त्यांच्या कामासाठी निधीची कमतरता पडू नये म्हणून राज्य शासन आपल्या अर्थसंकल्पात स्वतंत्र तरतूद करणार आहे. याशिवाय सीएसआर (उडठ), जिल्हा नियोजन समिती, १५ वा वित्त आयोग आणि रोजगार हमी योजनेच्या निधीचे अभिसरण (उेर्पींशीसशपलश) करून मोठ्या प्रमाणावर कामे हाती घेतली जातील. रस्ते तयार करण्यासाठी लागणारा मुरूम, माती किंवा दगड यासाठी कोणतेही रॉयल्टी (स्वामित्व धन) शुल्क भरावे लागणार नाही, त्यामुळे रस्त्यांचा खर्च कमी होऊन जास्त लांबीचे रस्ते तयार करणे शक्य होणार आहे.

शेतकऱ्यांनी हे लक्षात घेणे गरजेचे आहे की, या योजनेसाठी शासनाकडून कोणतेही भूसंपादन केले जाणार नाही. शेतकऱ्यांना स्वतःहून रस्त्यासाठी जमीन द्यावी लागेल आणि तसे संमतीपत्र किंवा दानपत्र द्यावे लागेल. एकदा दिलेली जमीन परत मागण्याचा हक्क शेतकऱ्याला राहणार नाही, याची नोंद सातबारा उताऱ्यावर घेतली जाईल. विधानसभा स्तरावर आमदारांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली जाणार असून, ही समिती रस्त्यांचे नियोजन आणि अंमलबजावणीवर लक्ष ठेवणार आहे.रस्त्यांच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. रस्त्यांचे काम झाल्यानंतर दोष निवारण कालावधी सहा महिने किंवा एक पावसाळा असेल. कंत्राटदाराने काम केल्यानंतर रस्त्याची गुणवत्ता तपासण्यासाठी 'कोअर कटिंग' टेस्ट करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या निर्णयामुळे ग्रामीण महाराष्ट्रातील दळणवळणाचा चेहरामोहरा बदलणार असून, शेतकऱ्यांचा शेतमाल थेट बांधावरून बाजारात जाण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

### गौरी गर्जेची आत्महत्या न

असल्याने गौरीचा घातपात झाल्याची चर्चा आहे. दरम्यान, अनंतला नेमकी कशासाठी अटक केली याची माहिती समजू शकली नाही.अनंत गर्जेवर गौरीला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याबद्दल परळी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. मात्र, आपली मुलीने आत्महत्या केली नसून तीची हत्या केली असल्याचा आरोप गौरीच्या वडिलांनी केला होता. त्यानंतर या प्रकरणी एसआयटी स्थापन करण्यात आली होती.

गौरी हिने २२ नोव्हेंबरला गळफास घेत आत्महत्या घेतल्याचे समोर आले होते. अनंत याचे विवाहबाह्य संबंध होते. याची माहिती गौरीला मिळाली होती तेव्हापासून अनंत, त्याचा भाऊ आणि बहीण हे गौरीचा छळ करत होते. तसेच माहेरी काही सांगितले तर अनंत हा आत्महत्येची धमकी देत होता. तेव्हापासून गौरी ही मानसिक तणावात होती, असे तिच्या वडिलांनी सांगितले होते. मात्र, आपली मुलगी ही आत्महत्या करणारी नसून तिची हत्या करण्यात आल्याचे त्यांनी म्हटले होते.

### राज्यात महापालिका

माघार घेण्याची मुदत २ जानेवारी २०२६, निवडणूक चिन्ह वाटप, अंतिम उमेदवार यादी ३ जानेवारी, मतदान दिनांक १५ जानेवारी २०२६, मतमोजणी १६ जानेवारी २०२६दरम्यान मतदार याद्यांमध्ये घोळ असल्याचा आरोप विरोधकांकडून